**L. A. BILL No. XXII OF 2023.**

*A BILL*

TO CREATE AN EFFECTIVE SINGLE WINDOW SYSTEM FOR DELIVERY OF SERVICES RELATED TO ISSUING OF PERMISSIONS REQUIRED FOR ESTABLISHING AND OPERATING INDUSTRIES; TO ENHANCE STATE'S COMPETITIVENESS ON TRADE AND INVESTMENTS; TO DEVELOP AN ECOSYSTEM TO ENSURE EASE OF DOING BUSINESS INCLUDING GRIEVANCE REDRESSAL MECHANISM IN THE STATE; AND TO DEVELOP AND MAINTAIN A PORTAL FOR PROVIDING ALL NECESSARY INFORMATION REQUIRED FOR INVESTMENT IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.**

**उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या देण्याच्या संबंधातील सेवा पुरविण्यासाठी; व्यापार व गुंतवणुका याबाबतीत राज्याच्या स्पर्धात्मकतेत वाढ करण्यासाठी; राज्यात व्यवसाय करणे सुलभ होण्याची सुनिश्चिती करण्याकरिता तक्रार निवारण यंत्रणेसह परिसंस्था विकसित करण्यासाठी; आणि महाराष्ट्र राज्यामध्ये गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्याकरिता एक पोर्टल विकसित करण्यासाठी व त्याची देखभाल करण्यासाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली तयार करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

एचबी ८९२—१

**ज्याअर्थी,** उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या देण्याच्या संबंधातील सेवा पुरविण्यासाठी; व्यापार व गुंतवणुका याबाबतीत राज्याच्या स्पर्धात्मकतेत वाढ करण्यासाठी; राज्यात व्यवसाय करणे सुलभ होण्याची सुनिश्चिती करण्याकरिता तक्रार निवारण यंत्रणेसह परिसंस्था विकसित करण्यासाठी; आणि महाराष्ट्र राज्यामध्ये गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्याकरिता एक पोर्टल विकसित करण्यासाठी व त्याची देखभाल करण्यासाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली तयार करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांकरिता कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३, हा प्रख्यापित केला होता ;

२०२३ चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ जुलै २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, राज्यात औद्योगिक उपक्रम उभारण्याकरिता किंवा कार्यान्वित करण्याकरिता परवानग्या देण्यासाठी सक्षम असलेला, शासनाचा कोणताही विभाग किंवा अभिकरण, स्थानिक प्राधिकरण, राज्याची मालकी असलेले महामंडळ अथवा कोणत्याही अधिनियमान्वये किंवा नियमान्वये घटित केलेले किंवा स्थापन केलेले किंवा शासनाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले इतर कोणतेही प्राधिकरण किंवा अभिकरण यांचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, तसेच औद्योगिक उपक्रमांना उपयुक्त सोयीसुविधा पुरविणाऱ्या सांविधिक अनुज्ञप्ती धारकांचा कोणताही अधिकारी व प्राधिकारी, असा आहे;

(ख) "अधिकारप्रदत्त समिती" याचा अर्थ, कलम ६ अन्वये घटित केलेली अधिकारप्रदत्त समिती, असा आहे;

(ग) "उद्योजक" याचा अर्थ, एखाद्या औद्योगिक उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक किंवा नियंत्रणकारी हितसंबंध असलेली व्यक्ती किंवा व्यक्तींचा निकाय किंवा कंपनी, असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ङ) "औद्योगिक उपक्रम" याचा अर्थ, उत्पादन करण्यामध्ये किंवा प्रक्रिया करण्यामध्ये अथवा दोन्हींमध्ये किंवा सेवा पुरविण्यामध्ये किंवा राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असा इतर कोणताही व्यवसाय किंवा वाणिज्यिक कार्य करण्यामध्ये सहभागी असलेला उपक्रम, असा आहे;

(च) "गुंतवणूकदार" याचा अर्थ, जी व्यक्ती, उत्पन्न किंवा नफा मिळविण्याच्या उद्देशाने, कोणत्याही नवीन औद्यागिक उपक्रमामध्ये किंवा विस्तार करण्यासाठी, आधुनिकीकरण करण्यासाठी किंवा विविधता आणण्यासाठी कोणत्याही विद्यमान औद्योगिक उपक्रमामध्ये, राज्यात भांडवल गुंतविते, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(छ) "नोडल अभिकरण" याचा अर्थ, कलम १४ अन्वये घोषित केलेले नोडल अभिकरण, असा आहे;

(ज) "परवानगी" याचा अर्थ, राज्यामध्ये औद्योगिक उपक्रम उभारण्याशी किंवा कार्यान्वित करण्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेली कोणतीही मान्यता, ना-हरकत प्रमाणपत्र, मंजुरी, नियतवाटप, संमती, नोंदणी, नावनोंदणी, अनुज्ञप्ती किंवा तत्सम बाबी, असा आहे आणि यात, कोणत्याही संबंधित कायद्यान्वये आवश्यक असलेल्या सर्व परवानग्यांचा समावेश आहे;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे;

(ञ) "संबंधित कायदा" याचा अर्थ, राज्यामध्ये औद्योगिक उपक्रम उभारण्यासाठी किंवा कार्यान्वित करण्यासाठी संबंधित असलेला, कोणताही अधिनियम, नियम, विनियम किंवा इतर कोणताही सांविधिक संलेख, असा आहे;

(ट) "सचिव" या संज्ञेत, शासनाचा प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिव, यांचा समावेश आहे;

(ठ) "एक खिडकी प्रणाली" याचा अर्थ, औद्योगिक उपक्रमास आवश्यक असलेल्या परवानग्यांसाठी अर्ज सादर करण्याकरिता व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी असलेले एक खिडकी राज्य-स्तरीय संकेतस्थळ आधारित ऑनलाईन पोर्टल किंवा प्लॅटफॉर्म, असा आहे;

(ड) "विनिर्दिष्ट काल मर्यादा" याचा अर्थ, ज्या काल मर्यादेमध्ये, परवानग्या मिळण्याच्या अर्जांवर प्रक्रिया करणे व ते निकालात काढणे अनिवार्य आहे अशी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ या अन्वये किंवा इतर कोणत्याही संबंधित कायद्यांन्वये विनिर्दिष्ट केलेली काल मर्यादा, असा आहे;

२०१५ चा महा. ३१.

(ढ) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ण) "पर्यवेक्षकीय समिति" याचा अर्थ, कलम १० अन्वये घटित केलेली पर्यवेक्षकीय समिती, असा आहे.

अर्ज दाखल करणे.

**३.** (१) राज्यात, नवीन औद्योगिक उपक्रम उभारण्याची किंवा विद्यमान औद्योगिक उपक्रम नियमितपणे कार्यान्वित ठेवण्याची इच्छा असणाऱ्या उद्योजकास किंवा गुंतवणूकदारास अथवा उद्योजकाने किंवा गुंतवणूकदाराने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, संबंधित कायद्यान्वये त्यासाठी आवश्यक असलेल्या, परवानग्या मिळविण्यासाठी एक खिडकी प्रणालीमार्फत, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अशा कोणत्याही अर्जासोबत, विहित करण्यात येईल असे प्रक्रिया शुल्क प्रदान करण्यात येईल.

अर्ज निकालात काढणे.

**४.** (१) सक्षम प्राधिकारी, एक खिडकी प्रणालीमार्फत कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, संबंधित कायद्याच्या तरतुदींअन्वये आवश्यक कार्यवाही करील.

(२) सक्षम प्राधिकारी, असा अर्ज निकालात काढण्यासाठी, जर आवश्यक असेल तर, अर्जदाराकडून विनिर्दिष्ट काल मर्यादेत अतिरिक्त माहिती मागवू शकेल.

(३) सक्षम प्राधिकारी, अशा अर्जावर, विनिर्दिष्ट काल मर्यादेत निर्णय घेईल. जर असा अर्ज फेटाळण्यात आला असेल तर, सक्षम प्राधिकारी, अशी फेटाळण्याची कारणे विनिर्दिष्ट करील.

अर्जाचे हस्तांतरण.

**५.** (१) संबंधित कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर सक्षम प्राधिकाऱ्याने, विनिर्दिष्ट काल मर्यादेत अर्ज निकालात काढला नसेल तर, नोडल अभिकरण, संबंधित कायद्यान्वये आवश्यक कार्यवाही करण्यासाठी असा अर्ज, अधिकारप्रदत्त समितीकडे हस्तांतरित करील :

परंतु, संबंधित कायद्यान्वये जे अर्ज निकालात काढण्याचे अधिकार, राज्य शासनाच्या अंतर्गत असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान केलेले आहेत तेच अर्ज केवळ, अधिकारप्रदत्त समितीकडे हस्तांतरित करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिकारप्रदत्त समितीकडे अर्ज हस्तांतरित केल्यावर, संबंधित कायद्यान्वये अशा अर्जांवर कार्यवाही करण्यासाठी असलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार समाप्त होतील.

(३) अधिकारप्रदत्त समिती, संबंधित कायद्याच्या तरतुदींनुसार असे अर्ज निकालात काढील.

अधिकारप्रदत्त समितीची रचना.

**६.** (१) अध्यक्ष म्हणून, विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र शासन आणि विहित करण्यात येतील असे इतर सदस्य यांचा समावेश असलेली, एक अधिकारप्रदत्त समिती असेल.

(२) अधिकारप्रदत्त समिती, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठका घेईल आणि तिचे कामकाज चालविण्यासाठी विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करील.

अधिकारप्रदत्त समितीचे अधिकार.

**७.** अधिकारप्रदत्त समितीस, पुढील अधिकार असतील :—

(क) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याने, विनिर्दिष्ट कालमर्यादेच्या आत, अर्जावर प्रक्रिया केली नसेल व ते निकालात काढले नसतील तेव्हा, अशा प्रकरणांमध्ये, कोणत्याही संबंधित कायद्यान्वये परवानगी मिळण्याचे असे अर्ज विचारात घेणे व ते निकालात काढणे;

(ख) अधिकारप्रदत्त समितीच्या बैठकांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक वाटतील अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा तज्ज्ञास निमंत्रित करणे;

(ग) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून अर्ज निकालात काढण्यात किंवा अर्ज फेटाळण्यात झालेल्या विलंबाची कारणे मागविणे आणि आवश्यक माहिती मागविणे आणि त्यास व्यक्तीशः उपस्थित राहण्यास भाग पाडणे;

(घ) सक्षम प्राधिकाऱ्याकडून अर्ज निकालात काढण्यात झालेल्या विलंबाच्या कारणांची किंवा अर्जदाराने उपस्थित केलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करणे;

(ङ) विहित करण्यात येतील असे इतर अधिकार.

अधिकारप्रदत्त समितीची कार्ये.

**८.** (१) अधिकारप्रदत्त समिती, पुढील कार्ये करील :—

(क) नोडल अभिकरणाच्या कामाचे पर्यवेक्षण करणे आणि या अधिनियमाची उद्दिष्ट्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक निदेश देणे;

(ख) एक खिडकी प्रणालीच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे आणि सर्व अर्जांच्या स्थितीचा वेळोवेळी आढावा घेणे;

(ग) विनिर्दिष्ट काल मर्यादेनंतर प्रलंबित असणाऱ्या सर्व अर्जांचा आढावा घेणे आणि ते निकालात काढण्यासाठी यथोचित आदेश पारित करणे;

(घ) एक खिडकी प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे व प्रमाण कार्यचालन कार्यपद्धती तयार करणे;

(ङ) शासकीय सेवांच्या ऑनलाईन सुसाध्यतेसाठी आणि एक खिडकी प्रणालीशी त्यांचे एकात्मिकरण करण्यासाठी संबंधित विभागांना व प्राधिकरणांना निदेश देणे;

(च) त्यास योग्य वाटतील अशा धोरणात्मक शिफारशी पर्यवेक्षकीय समितीस करणे आणि राज्यामध्ये व्यवसाय करणे सुलभ होण्याची व गुंतवणूक वाढविण्याची सुनिश्चिती करण्यासाठी परिसंस्था विकसित करणे;

(छ) अर्जदारांनी उपस्थित केलेल्या सर्व तक्रारींची दखल घेणे आणि आवश्यक वाटल्यास, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल मागविणे;

(ज) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये.

(२) अधिकारप्रदत्त समिती, या अधिनियमाखालील तिच्या कार्यांबद्दल पर्यवेक्षकीय समितीला तिचा त्रैमासिक अहवाल सादर करील.

अधिकार प्रदत्त समितीचे निर्णय बंधकारक असणे.

**९.** कोणत्याही संबंधित कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिकारप्रदत्त समितीचे निर्णय, अर्जदारांवर, प्राधिकाऱ्यांवर व इतर सर्व संबंधित व्यक्तींवर बंधनकारक असतील.

पर्यवेक्षकीय समितीची रचना.

**१०.** (१) अध्यक्ष म्हणून सचिव, उद्योग आणि विहित करण्यात येतील असे इतर सदस्य यांचा समावेश असलेली, एक पर्यवेक्षकीय समिती असेल.

(२) पर्यवेक्षकीय समिती, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठका घेईल आणि तिचे कामकाज चालविण्यासाठी विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करील.

पर्यवेक्षकीय समितीचे अधिकार.

**११.** पर्यवेक्षकीय समितीस पुढील अधिकार असतील :—

(क) अधिकारप्रदत्त समितीने निर्दिष्ट केलेले प्रस्ताव तपासणे व त्यांवर निर्णय घेणे;

(ख) तिला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा तज्ज्ञास, पर्यवेक्षकीय समितीच्या बैठकांमध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित करणे ;

(ग) विहित करण्यात येतील असे इतर अधिकार.

पर्यवेक्षकीय समितीची कार्ये.

**१२.** पर्यवेक्षकीय समिती, पुढील कार्ये करील :-

(क) राज्यामध्ये व्यवसाय करणे सुलभ होण्याच्या संबंधातील कोणत्याही मुद्यांबाबत अधिकारप्रदत्त समितीला निदेश देणे;

(ख) तिला उचित वाटेल त्याप्रमाणे संबंधित प्राधिका-यांना धोरणात्मक शिफारशी करणे;

(ग) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याने, विहित कालमर्यादेच्या आत अर्ज निकालात काढले नसतील किंवा पुरेशा कारणांशिवाय त्याने अर्ज फेटाळला असेल त्याबाबतीत, अधिकारप्रदत्त समितीने निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांमध्ये तिचे समाधान झाल्यावर, विभागाच्या संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याला शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करणे ;

(घ) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये.

पर्यवेक्षकीय समितीचे निर्णय बंधनकारक असणे.

**१३.** कोणत्याही संबंधित कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पर्यवेक्षकीय समितीचे निर्णय, अर्जदारांवर, प्राधिकाऱ्यांवर व इतर सर्व संबंधित व्यक्तींवर बंधनकारक असतील.

नोडल अभिकरण.

**१४.** (१) महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष (मैत्री) हा, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्रामध्ये एक खिडकी प्रणालीसाठी नोडल अभिकरण असेल.

(२) नोडल अभिकरण, वेळोवेळी आवश्यक असतील अशा विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची जसे की, माहिती तंत्रज्ञान (आयटी), विधि, वित्त, अर्थशास्त्र किंवा इतर कोणतेही तज्ज्ञ यांची नियुक्ती करील किंवा त्यांचे सहाय्य घेईल.

नोडल अभिकरणाची कार्ये.

**१५.** अधिकारप्रदत्त समितीच्या अधीक्षणास, निदेशनास व नियंत्रणास अधीन राहून, नोडल अभिकरणाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील:—

(क) राज्यामध्ये, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी समन्वय साधून गुंतवणूक प्रचालनासाठी आणि व्यवसाय किंवा औद्योगिक उपक्रम उभारण्यासाठी कार्य करणे;

(ख) राज्यामध्ये औद्योगिक उपक्रम उभारण्यासाठी उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना मार्गदर्शन व सहाय्य करणे;

(ग) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याने विहित काल मर्यादेत अर्ज विचारात घेतला नसेल किंवा निकालात काढला नसेल तर, उद्योजक किंवा गुंतवणूकदार यांचे अर्ज, अधिकारप्रदत्त समितीसमोर, तिच्या निर्णयार्थ सादर करणे;

(घ) अर्जांच्या स्थितीचे संनियंत्रण करणे आणि अर्जांच्या स्थितीचा अहवाल अधिकारप्रदत्त समितीसमोर सादर करणे;

(ङ) केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा त्यांच्या सांविधिक व इतर संस्थाकडून परवानग्या मिळविण्यामध्ये उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना सहाय्य करणे;

(च) उद्योजकांच्या किंवा गुंतवणूकदारांच्या अर्जांसाठी, “मैत्री” याचे इतर संकेतस्थळांशी एकात्मीकरण करण्यासाठी आणि एक खिडकी प्रणालीचे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असे कोणतेही सहाय्य करण्यासाठी, विविध सक्षम प्राधिका-यांशी समन्वय साधणे ;

(छ) नवीन गुंतवणुकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे व प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती तयार करणे आणि तिचे वेळोवेळी पुर्नविलोकन करणे व त्यात फेरबदल करणे;

(ज) उद्योजकांनी किंवा गुंतवणूकदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रतिसाद देणे;

(झ) औद्योगिक प्रगतीसाठी धोरण तयार करण्यामध्ये आवश्यक सहाय्य करणे;

(ञ) पर्यावरण पूरक व तंत्रज्ञान सहाय्यभूत उत्पादन पद्धतीला चालना देणे;

(ट) एक खिडकी प्रणालीमार्फत अर्ज सादर करण्यासाठी अर्जाचा नमुना किंवा संयुक्त अर्जाचा नमुना किंवा सामाईक अर्जाचा नमुना तयार करणे आणि देणे;

(ठ) व्यवसाय करणे सुलभ व्हावे या उद्देशाने, राज्यामध्ये औद्योगिक उपक्रम स्थापन करण्यासाठी आणि त्यांचे कार्यान्वयन करण्यासाठी वापरकर्त्यांच्या प्रतिक्रियांच्या आधारे, नियमनकारी सुधारणा प्रस्तावित करणे, सुकर करणे किंवा लागू करणे;

(ड) अर्जाचे नमुने पूर्ण करण्यामध्ये उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना सहाय्य करणे;

(ढ) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये.

तपासण्यांचे सुसूत्रीकरण.

**१६.** संबंधित प्राधिकाऱ्यांद्वारे, संबंधित कायद्याच्या तरतुदींखालील तपासण्या, व्यवहार्य असेल तेथवर, यादृच्छिक निवडीच्या आधारे, संयुक्तपणे करण्यात येतील.

खर्च.

**१७.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेला सर्व खर्च, उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन करील.

(२) पर्यवेक्षकीय समितीकडून व अधिकारप्रदत्त समितीकडून प्राप्त झालेल्या निदेशांची तसेच किंमत, खर्च किंवा अपेक्षित वित्तीय भार, इत्यादींच्या संबंधातील अशा कोणत्याही निदेशांची उद्योग संचालनालयाद्वारे अर्थसंकल्पात पर्याप्त तरतुदी करून यथोचितरीत्या पूर्तता करण्यात येईल.

काल मर्यादा.

**१८.** (१) पर्यवेक्षकीय समिती व अधिकारप्रदत्त समिती, विहित करण्यात येईल अशा काल मर्यादेत, या अधिनियमाखालील व त्याखाली केलेल्या नियमांखालील त्यांच्या अधिकारांचा वापर करील व त्यांची कार्ये पार पाडील.

(२) नोडल अभिकरण किंवा सक्षम प्राधिकारी किंवा अधिकारप्रदत्त समिती, उद्योजकाने किंवा गुंतवणूकदाराने किंवा कोणत्याही व्यक्तीने उपस्थित केलेल्या प्रश्नांना विहित करण्यात येईल अशा काल मर्यादेत प्रतिसाद देईल.

शुल्क आकारण्याचा अधिकार.

**१९.** नोडल अभिकरणास, एक खिडकी प्रणालीमार्फत उपलब्ध करून द्यावयाच्या सेवांसाठी विहित करण्यात येतील असे शुल्क आकारता येईल.

ऑनलाईन विझार्ड मॉड्युल.

**२०.** (१) नोडल अभिकरण, राज्यामध्ये औद्योगिक, वाणिज्यिक किंवा व्यवसाय संबंधित उपक्रम स्थापन करण्यासाठी, उभारण्यासाठी व कार्यान्वित करण्याकरिता आवश्यक असलेल्या परवानग्या निश्चित करण्यामध्ये उद्योजकांना व गुंतवणूकदारांना सहाय्य करण्यासाठी सर्वसमावेशक ऑनलाईन विझार्ड मॉड्युल संकल्पचित्रित करील व विकसित करील.

(२) विझार्ड मॉड्युल, उद्योजकांकडून किंवा गुंतवणूकदारांकडून, औद्योगिक उपक्रमांचे प्रकार, कर्मचाऱ्यांची संख्या, ठिकाण, इत्यादींसारखी विवक्षित माहिती स्वीकारण्याकरिता, सुसज्ज करण्यात येईल.

(३) विझार्ड मॉड्युल, उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना जे आवश्यक असतील असे परवानग्यांच्या अर्जांच्या नमुन्यांचे दुवे (लिंक) व माहितीसाठी संबंधित अधिसूचना पुरवील.

(४) संबंधित विभाग किंवा प्राधिकरण, सर्व विद्यमान परवानग्या विझार्ड मॉड्युलअंतर्गत समाविष्ट करण्याकरिता, वेळोवेळी प्रयत्न करील.

(५) संबंधित विभाग किंवा प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा कालमर्यादेत, विझार्ड मॉड्युलचा भाग म्हणून समाविष्ट करावयाच्या अतिरिक्त नवीन परवानगीबाबतची माहिती पुरवील.

प्रारूप धोरणे, नियम व विनियम यांवर जनतेशी विचारविनिमय करणे.

**२१.** (१) नोडल अभिकरण, कोणतीही धोरणे, नियम व विनियम यांच्या प्रारूपांवर जनतेचे अभिप्राय किंवा प्रतिक्रिया स्वीकारण्याच्या वैशिष्ट्यांसह असे प्रारूप प्रसिद्ध करण्यासाठी, ऑनलाईन तरतुदी करील.

(२) संबंधित प्राधिकरणास धोरणे, नियम व विनियम यांचे प्रारूप प्रसिद्ध करण्यासाठी एक खिडकी प्रणालीचा वापर करता येईल आणि अशी धोरणे, नियम व विनियम यांवरील जनतेचे अभिप्राय किंवा प्रतिक्रिया यथोचितरीत्या विचारात घेता येतील.

(३) संबंधित प्राधिकरणास, प्रस्तावित नवीन किंवा सुधारित धोरणे, नियम व विनियम तसेच अशा धोरणांच्या, नियमांच्या व विनियमांच्या गरजा किंवा उद्दिष्टे आणि ज्या रीतीने अशी प्रस्तावित धोरणे, नियम व विनियम व्यवसायांवरील किंवा उद्योगांवरील भार कमी करतील ती रीत देखील प्रदर्शित करता येईल.

गोपनीयता.

**२२.** शासनाचे  कोणतेही अभिकरण किंवा प्राधिकरण किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण तसेच त्याअंतर्गत असलेले कोणतेही कार्याधिकारी, उद्योजकाच्या किंवा गुंतवणूकदाराच्या संमतीशिवाय, अशा उद्योजकाच्या किंवा गुंतवणूकदाराच्या बौद्धिक संपदेची कोणतीही माहिती, इतर कोणत्याही उद्योजकाकडे किंवा गुंतवणूकदाराकडे किंवा यथोचितरीत्या प्राधिकृत न केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे, उघड करणार नाही.

निदेश देण्याचा अधिकार.

**२३.** राज्य शासनास, या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा धोरणात्मक बाबींच्या संबंधात, अधिकारप्रदत्त समितीस, वेळोवेळी, असे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देता येतील, आणि अधिकारप्रदत्त समिती, अशा निदेशांचे पालन करण्यास व त्यानुसार कार्यवाही करण्यास बांधील असेल.

संक्रमणकालीन तरतुदी.

**२४.** जर संबंधित उद्योजकाने किंवा गुंतवणूकदाराने एक खिडकी प्रणालीमार्फत अर्ज सादर करण्याचा पर्याय निवडला असेल तर, या अधिनियमाच्या तरतुदी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून शासनाच्या किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाच्या, प्राधिकरणांच्या किंवा उपक्रमांच्या विचारार्थ सादर केलेल्या सर्व गुंतवणूक प्रस्तावांस लागू असतील.

अधिभावी परिणाम असणे.

**२५.** या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली केलेले नियम, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या राज्याच्या कोणत्याही कायद्यात त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, अधिभावी ठरतील.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

**२६.** पर्यवेक्षकीय समितीचा किंवा अधिकारप्रदत्त समितीचा अध्यक्ष किंवा इतर सदस्य किंवा अशा समितीच्या निदेशाखाली काम करणारा शासनाचा कोणताही कर्मचारी यांनी, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांन्वये, सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**२७.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२८.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे अशी अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या पोट-कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२९.** (१) महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२३ चा महा. अध्या. ४.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये जलद गतीने होणारी वाढ व नवीन उपक्रम यामुळे संपूर्ण व्यवसाय परिसंस्थेतील शासनाची भूमिका बदललेली आहे. शासनाने केवळ नियंत्रकाचीच नव्हे तर, व्यवसाय परिसंस्था विकासकाची भूमिका देखील बजावणे अपेक्षित आहे.

२. राज्यामध्ये गुंतवणूक करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनाने, गुंतवणूकदारांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सन २०१४ मध्ये, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष (मैत्री) उभारला आहे. महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णयाद्वारे, "मैत्री" याचे, राज्य एक खिडकी प्रणाली म्हणून रूपांतर केले आहे.

३. राज्य एक खिडकी प्रणाली म्हणून प्रभावीपणे कार्य करण्याच्या दृष्टीने, "मैत्री" यास अतिरिक्त अधिकार प्रदान करणे गरजेचे आहे. सक्षम एक खिडकी प्रणालीच्या स्थापनेचे अनेकविध फायदे आहेत. राज्यात गुंतवणूकदार व उद्योजक- प्राधान्यकारी वातावरणाची निर्मिती केल्यामुळे केवळ राज्याच्या अर्थव्यवस्थेलाच चालना मिळणार नाही तर, देशांतर्गत व परकीय गुंतवणुकीसाठी राज्य सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनण्याची सुनिश्चिती होण्याबरोबरच विविध क्षेत्रांमध्ये नोकऱ्या निर्माण करण्यास देखील मदत होईल. म्हणून, विविध कायद्यांन्वये उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या, मान्यता, मंजुऱ्या व ना-हरकत प्रमाणपत्रे देण्याच्या संबंधातील सेवा पुरवण्यासाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली निर्माण करण्याच्या प्रयोजनांसाठी कायदा करणे शासनास इष्ट वाटले.

देशभरात व्यवसाय करणे सुलभ होण्याची सुनिश्चिती करण्याच्या उद्देशाने, भारत सरकारने देखील, अलीकडेच राष्ट्रीय एक खिडकी प्रणाली (एनएसडब्ल्यूएस) सुरू केली आहे. केंद्र व राज्य पोर्टल्स यांमधील प्रभावी दुव्यांची सुनिश्चिती करून, त्याद्वारे या संबंधातील केंद्र सरकारचे आणि राज्य शासनाचे प्रयत्न सफल होण्यास "मैत्री" मदत करील.

४. प्रभावी एक खिडकी प्रणाली निर्माण करण्याच्या प्रयोजनासाठी कायदा अधिनियमित करण्यासाठी एक तत्सम विधेयक, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ म्हणून महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेद्वारे ३ मार्च २०२३ रोजी संमत करण्यात आले होते आणि त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले होते.

शासनास उक्त विधेयकामध्ये काही फेरबदल करणे आवश्यक वाटल्याने, ते १३ मार्च २०२३ रोजी विधानपरिषदेमधून परत घेतले. त्यानुसार, आवश्यक ते बदल करण्यात आले.

५. कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) "मैत्री" हे, महाराष्ट्र राज्यातील एक खिडकी प्रणालीसाठी नोडल अभिकरण असेल, अशी तरतूद करणे;

(दोन) संबंधित कायद्यान्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही परवानगीकरिता एक खिडकी प्रणालीमार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज करण्यासाठी तरतूद करणे;

(तीन) "मैत्री" च्या कामाचे पर्यवेक्षण करणे, सक्षम प्राधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट काल मर्यादेत निकालात न काढलेल्या अर्जांवर निर्णय घेणे व ते निकालात काढणे, अर्जदारांच्या तक्रारींचे निवारण करणे, इत्यादींकरिता, अध्यक्ष म्हणून, विकास आयुक्त (उद्योग) यांचा समावेश असलेली अधिकारप्रदत्त समिती घटित करण्याकरिता तरतूद करणे;

(चार) अधिकारप्रदत्त समितीने निर्दिष्ट केलेल्या प्रस्तावांची तपासणी करणे, व्यवसाय करणे सुलभ होण्याच्या संबंधातील कोणत्याही मुद्यांबाबत निदेश देणे, संबंधित प्राधिकाऱ्यांना धोरणात्मक शिफारशी करणे, इत्यादींसाठी अध्यक्ष म्हणून सचिव (उद्योग) यांचा समावेश असलेली पर्यवेक्षकीय समिती घटित करण्याकरिता तरतूद करणे;

(पाच) सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे संबंधित कायद्यांच्या तरतुदीखालील तपासण्या, व्यवहार्य असेल तेथवर यादृच्छिक निवडीच्या आधारे संयुक्तपणे करण्यात येतील याची तरतूद करणे;

(सहा) राज्यामध्ये उद्योग उभारण्यासाठी उद्योजकांना किंवा गुंतवणूकदारांना सहाय्य करण्याकरिता सर्वसामावेशक ऑनलाईन विझार्ड मॉड्युल संकल्पचित्रित व विकसित करण्यासाठी तरतूद करणे.

६. महाराष्ट्र राज्य, एक खिडकी प्रणालीसाठी एक नोडल अभिकरण असलेल्या मैत्रीमार्फत महाराष्ट्र राज्यामध्ये आपले व्यवसाय उभारण्यासाठी इच्छुक असणाऱ्या सर्व गुंतवणूकदारांसाठी व उद्योजकांसाठी सुरळीत एक खिडकी निपटारा प्रणाली उपलब्ध करून देऊन त्याद्वारे, व्यवसाय करणे सुलभ होण्यासाठी स्वतःचे एक अढळ स्थान निर्माण करण्यास सक्षम होईल.

७. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी कायदा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३ जुलै २०२३ रोजी, महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ (सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४), हा प्रख्यापित केला होता.

८. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **उदय सामंत,**
दिनांक १७ जुलै, २०२३. उद्योग मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३.—**या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) अन्वये, ज्यासाठी एक खिडकी प्रणालीमार्फत अर्ज करण्यात येईल त्या संबंधित कायद्यान्वये आवश्यक असलेल्या परवानग्या, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करण्याचा;

(ख) उप-खंड (२) अन्वये, उप-खंड (१) अन्वये केलेल्या अर्जासोबत प्रदान करावयाचे प्रक्रिया शुल्क नियमांद्वारे विहित करण्याचा,

अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६.—**या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) अन्वये, अधिकारप्रदत्त समितीच्या अध्यक्षाव्यतिरिक्त तिचे सदस्य, नियमांद्वारे विहित करण्याचा,

(ख) उप-खंड (२) अन्वये, अधिकारप्रदत्त समितीच्या बैठका घेण्याची वेळ व ठिकाण आणि तिचे कामकाज चालविण्यासाठी अंगीकार करावयाची कार्यपद्धती नियमांद्वारे विहित करण्याचा,

अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७(ङ).—**या खंडान्वये, खंड ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेले असतील त्याव्यतिरिक्त अधिकारप्रदत्त समितीचे इतर अधिकार, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८(१)(ज).—**या खंडान्वये, खंड ८ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले असतील त्या व्यतिरिक्त अधिकारप्रदत्त समितीची इतर कार्ये, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०.—**या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) अन्वये, पर्यवेक्षकीय समितीच्या अध्यक्षाव्यतिरिक्त तिचे सदस्य, नियमांद्वारे विहित करण्याचा ;

(ख) उप-खंड (२) अन्वये, पर्यवेक्षकीय समितीच्या बैठका घेण्याची वेळ व ठिकाण आणि तिचे कामकाज चालविण्यासाठी अंगीकार करावयाची कार्यपद्धती नियमांद्वारे विहित करण्याचा,

अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११(ग).—**या खंडान्वये, खंड ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेले असेल त्या व्यतिरिक्त, पर्यवेक्षकीय समितीचे इतर अधिकार, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२(घ).—**या खंडान्वये, खंड १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले असेल त्या व्यतिरिक्त, पर्यवेक्षकीय समितीची इतर कार्ये, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १५(ढ).—**या खंडान्वये, खंड १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेले असेल त्या व्यतिरिक्त, नोडल अभिकरणाची इतर कार्ये, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८.—**या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) अन्वये, पर्यवेक्षकीय समितीने व अधिकारप्रदत्त समितीने, या अधिनियमाखालील व त्याखाली केलेल्या नियमांखालील अधिकारांचा वापर करण्याची आणि कार्ये पार पाडण्याची कालमर्यादा नियमांद्वारे विहित करण्याचा ;

(ख) उप-खंड (२) अन्वये, नोडल अभिकरणाने किंवा सक्षम प्राधिकरणांनी, उद्योजकांनी किंवा गुंतवणूकदारांनी किंवा कोणत्याही व्यक्तीने उपस्थित केलेल्या प्रश्नांना विहित काल मर्यादेत प्रतिसाद देण्याची काल मर्यादा नियमांद्वारे विहित करण्याचा,

अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १९.—**या खंडान्वये, एक खिडकी प्रणालीमार्फत उपलब्ध करून द्यावयाच्या सेवांचे शुल्क, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २०(५).—**या खंडान्वये, संबंधित विभागाने किंवा प्राधिकरणाने, विझार्ड मॉड्युलचा भाग म्हणून समाविष्ट करावयाची अतिरिक्त नवीन परवानगीची माहिती पुरविण्याची कालमर्यादा, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २३.—**या खंडान्वये, या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा धोरणात्मक बाबींच्या संबंधात अधिकारप्रदत्त समितीला, सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २७.—**या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २८.—**या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, जी कोणतीही अडचण उद्‌भवेल ती अडचण दूर करण्यासाठी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

**वित्तीय ज्ञापन**

राज्यात नवीन औद्योगिक उपक्रम उभारण्यासाठी किंवा राज्यातील विद्यमान औद्योगिक उपक्रम कार्यान्वित ठेवण्यासाठी एक खिडकी प्रणालीमार्फत इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उद्योजकाकडून किंवा गुंतवणूकदाराकडून अर्ज दाखल करण्यासाठी, अधिकारप्रदत्त समिती घटित करण्यासाठी, पर्यवेक्षकीय समिती घटित करण्यासाठी आणि राज्यात अनुक्रमे, औद्योगिक, वाणिज्यिक किंवा व्यवसाय यांच्याशी संबंधित असलेले उपक्रम स्थापन करण्यासाठी, उभारण्यासाठी व कार्यान्वित करण्याकरिता आवश्यक असलेल्या परवानग्या निश्चित करण्यामध्ये उद्योजकांना व गुंतवणूकदारांना सहाय्य करण्यासाठी मैत्रीद्वारे सर्वसमावेशक ऑनलाईन विझार्ड मॉड्युल संकल्पचित्रित करण्यासाठी या विधेयकाच्या खंड ३, ६, १० व २० यांमध्ये तरतुदी केल्या आहेत.

अशा प्रकारे, हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर त्यामध्ये, राज्याच्या एकत्रित निधीतून अंदाजे रूपये पाच कोटी इतक्या अनावर्ती खर्चाचा आणि दरवर्षी कराव्या लागणाऱ्या रुपये आठ कोटी इतक्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२. ]**

**[ उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या देण्याच्या संबंधातील सेवा पुरविण्यासाठी; व्यापार व गुंतवणुका याबाबतीत राज्याच्या स्पर्धात्मकतेत वाढ करण्यासाठी; राज्यात व्यवसाय करणे सुलभ होण्याची सुनिश्चिती करण्याकरिता तक्रार निवारण यंत्रणेसह परिसंस्था विकसित करण्यासाठी; आणि महाराष्ट्र राज्यामध्ये गुंतवणुकीसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्याकरिता एक पोर्टल विकसित करण्यासाठी व त्याची देखभाल करण्यासाठी प्रभावी एक खिडकी प्रणाली तयार करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. उदय सामंत,**
उद्योग मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) कार्यभार,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई